12 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अणुऊर्जा विभागातील रोजगार संधींबाबत आज वरिष्ठ शास्त्रज्ञांचा विद्यार्थ्यांशी संवाद

कोल्हापूर : भारत सरकारच्या अणुऊर्जा विभाग (डीएई) मधील करिअरच्या संधी आणि भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी) द्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी 'डीएई आउटरीच प्रोग्राम-२०२६' चे आयोजन शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र अधिविभाग आणि अणुऊर्जा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे. सोमवारी (दि.१२) विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होईल. यामध्ये बीएआरसीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि अभियंते उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

विशेषतः विज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

देशातील अणुऊर्जा क्षेत्रातील विविध राष्ट्रनिर्माण उपक्रमांना गती देण्यासाठी, भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी) प्रशिक्षण शाळेमार्फत दरवर्षी अणुऊर्जा विभाग (डीएई) वैज्ञानिक अधिकाऱ्यांची भरती करत असते. या OCES (Orientation Course for Engineering Graduates and Science Postgraduates) कार्यक्रमांतर्गत दरवर्षी सुमारे १५० अभियांत्रिकी पदवीधर आणि ७५ विज्ञान पदव्युत्तर विद्यार्थ्यांना निवडले जाते. या कार्यक्रमाद्वारे अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना, विशेषतः अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना, डीएई मधील संशोधन-विकासाच्या आघाडीच्या क्षेत्रांविषयी माहिती देणे आणि त्यामधील करिअरच्या संधींबद्दल मार्गदर्शन करणे हे उद्दिष्ट आहे.

संशोधन, नवनिर्मिती आणि राष्ट्र उभारणीत रस असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे सत्र अत्यंत लाभदायक ठरणार आहे. बीएआरसी व्यतिरिक्त, डीएईच्या अंतर्गत येणाऱ्या इंदिरा गांधी सेंटर फॉर अ‍ॅटॉमिक रिसर्च, राजा रामण्णा सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, व्हेरिएबल एनर्जी सायक्लोट्रॉन सेंटर, अ‍ॅटॉमिक मिनरल्स डायरेक्टरेट, आणि जागतिक अणुऊर्जा भागीदारी केंद्र तसेच डीएईच्या इतर संस्थांमध्ये करिअर कसे करावे, याचे मार्गदर्शन मिळेल.

12 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्यावतीने दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत मोडी लिपी प्रशिक्षण ही कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.

कार्यशाळा एकूण पाच दिवस व ३० तास अशा स्वरूपाची होती. पहिल्या दिवशी साधन व्यक्ती म्हणून विश्वासराव नाईक महाविद्यालय शिराळाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. तानाजी हवालदार यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी 'मराठा कालखंड आणि मोडी कागदपत्रे' यांच्या सहसंबंधाविषयी विशेष मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी यांनी 'मोडीची ओळख व त्याचे प्रत्यक्ष




उपयोजन आणि मोडी कागदपत्रांचे प्रकार' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी साधन व्यक्ती म्हणून मोडी तज्ज्ञ पांडुरंग आंबले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'मोडी कालगणना व मराठेकालीन कालगणनेचे संशोधनीय उपयोजन' या विषयावर उजळणी वर्ग तथा मार्गदर्शन केले. चौथ्या दिवशी महावीर महाविद्यालय कोल्हापूर येथील इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक तथा मोडी तज्ज्ञ चंद्रशेखर कटे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'मोडी दस्तावेजांची लेखन शैली व गणितीय उजळणी' या विषयावर मार्गदर्शन केले. अखेरच्या पाचव्या दिवशी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर येथील सहाय्यक प्राध्यापिका व मोडी तज्ज्ञ डॉ. पूनम भूयेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'प्रत्यक्ष मोडीचे उपयोजन तथा उजळणी वर्ग' घेतला.

या कार्यशाळेचा समारोप समारंभ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. दत्तात्रय मचाले व डॉ. पुनम भूयेकर यांच्या उपस्थितीत झाला. या कार्यशाळेसाठी इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या अभ्यासक्रमासाठी एकूण ५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४० विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. अनेक ज्येष्ठ नागरिकांनीही या कार्यशाळेत आवर्जून सहभाग नोंदवून या कार्यशाळेचा लाभ घेतला.

2026

महा न्यूज ब्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

जनत...
...भवाजी विद्या...

# 'शिवस्पंदन'मध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग सलग चौथ्यांदा विजेता




कोल्हापूर, (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज):

शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने विक्रमी कामगिरी नोंदविली आहे. काल (दि. ८) रात्री प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण मोठ्या जल्लोषी वातावरणात करण्यात आले.

गेले तीन दिवस शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाचा कळसाध्याय काल रात्री गाठला गेला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह सुगम गायन, स्थळचित्रण, एकल नृत्य, भारतीय समूहगीत, मूकनाट्य आणि लघुपट या प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवित सर्वसाधारण विजेतेपदावर सलग चौथ्यांदा आपले नाव कोरले.

महोत्सवात काल अखेरच्या दिवशी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य आणि समूहनृत्य स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांतील सादरीकरणांना तसेच पारितोषिक वितरण समारंभाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा अत्यंत उत्साही प्रतिसाद लाभला. रात्री उशीरापर्यंत चाललेल्या या समारंभाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मोठा जल्लोषी प्रतिसाद लाभला.

या स्पर्धांनंतर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, महोत्सव समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. प्रमोद कसबे यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. मीना पोतदार यांनी विजेत्यांची नावे घोषित केली. विद्यार्थी विकास मंडळाच्या डॉ. सुरेखा आडके, विजय इंगवले, विशाल म्हातुगडे, अभिषेक कॅंबळीकर, प्रियांका पांडव, अंकिता चव्हाण, मॉंटी मिसाळ यांनी यशस्वी संयोजन केले. यावेळी के.एस. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मतदार जागृतीविषयक पथनाट्यालाही विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी यावेळी मतदान करणेबाबत सामूहिक शपथही घेतली.

स्पर्धेचा सविस्तर अंतिम निकाल अनुक्रमे असा-

शोभायात्रा: संगीत व नाट्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, गणित, एम.बी.ए युनिट (वाणिज्य व व्यवस्थापन).

एकल लोकवाद्य वादन: जाधव प्रतिक सुनिल (संगणकशास्त्र), पठाण रेहान इकबाल (संगीत व नाट्यशास्त्र), ढोले गुरुनाथ गजानन (संगीत व नाटयशास्त्र), सुतार सोहन नारायण (वनस्पतीशास्त्र), गुरव सुप्रिया किशोर (समाजशास्त्र).

सुगम गायन: पाटील प्रथमेश सचिन (संगीत व नाटयशास्त्र), कोकळे सप्निल रमेश (संगीत व नाट्यशास्त्र), पांचाळ मृण्मयी सदाशिव (मराठी), माळी वैभव हनुमंत (रसायनशास्त्र), कुंभार विशाल चंद्रकांत (पर्यावरणशास्त्र).

नकला: पवेकर प्रेम विठ्ठल (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुलर डेव्हलपमेंट), सुतार सोहन नारायण (वनस्पतीशास्त्र), लोहार आसावरी पांडुरंग (संगीत व नाटयशास्त्र), मायने अंजली राजेंद्र (स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅण्ड बायोटेक्नॉलॉजी), जांभळे ऋतुजा सचिन (स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅण्ड बायोटेक्नॉलॉजी).

रांगोळी: पांचाळ मृण्मयी सदाशिव (मराठी), जठार कुलदिप विजयकुमार (संगीत व नाट्यशास्त्र), खडकीकर सोनल विनायक (संगीत व नाटयशास्त्र), नलवडे मोनिका संतोष (एम.बी.ए युनिट), घोडके अंकिता बाबुराव (गणित).

स्थळचित्र: ढवळे धोंडी नारायण (संगीत व नाट्यशास्त्र), चराटकर श्रध्दा देवदत्त (संगीत व नाटयशास्त्र), मुल्ला रमजान दस्तगिर (हिंदी), कुलकर्णी अजित धनंजय (एम.बी.ए युनिट), सुर्वे विराज सरदार (एम.बी.ए. युनिट).

एकल नृत्य: शुक्ला श्रद्धा शशिकुमार (संगीत व नाटयशास्त्र), कांबळे अनुराधा राजाराम (संगणकशास्त्र), शिंदे नेहा रघुनाथ (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुलर डेव्हलपमेंट), सावर्डेकर निधी नितिन (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), पाटील प्रणय (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट).

भारतीय समूहगीत: संगीत व नाटयशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित, राज्यशास्त्र.

लघुनाटिका: गणित, पर्यावरणशास्त्र, एम.बी.ए. युनिट, अर्थशास्त्र, संगीत व नाटयशास्त्र.

मूकनाट्य: संगीत व नाट्यशास्त्र, भूगोल.

लघुपट: संगीत व नाटयशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅण्ड बायोटेक्नॉलॉजी, स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, हिंदी.

समूहनृत्य: संगीत व नाटयशास्त्र, शिक्षणशास्त्र, अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, भूगोल

कथा लेखन स्पर्धा (मराठी): विमल दादासाहेब मोरे (मराठी), अनिकेत मच्छिंद्र कांबळे (इंग्रजी), उज्वला चंद्रकांत कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन), निरंजन संजय घुगे (रसायनशास्त्र), सौरभ रामचंद्र कापसे (समाजशास्त्र).

कथा लेखन स्पर्धा (हिंदी): आदित्य रविंद्रनाथ सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), अविनाश दिलीप कांबळे (हिंदी), प्रतीक्षा शामराव पाटील (संगीत व नाट्यशास्त्र), गुलामगीस फिरोज तांबोळी (हिंदी), उज्वला चंद्रकांत कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन).

कथा लेखन स्पर्धा (इंग्रजी): विश्वजीत राजेंद्र पाटील (संगणकशास्त्र), प्रतीक्षा शामराव पाटील (संगीत व नाटयशास्त्र), प्रेम विठ्ठल पवेकर (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), आदित्य रविंद्रनाथ सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), श्रीधर शिवाजी निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी).

कविता लेखन स्पर्धा (मराठी): अनिकेत मच्छिंद्र कांबळे (इंग्रजी), यश कृष्णात कवडे (राज्यशास्त्र), निरंजन संजय घुगे (रसायनशास्त्र), मोसिम राजअहमद पठाण (राज्यशास्त्र) प्रिया शुकराज हळदणकर (समाजशास्त्र).

कविता लेखन स्पर्धा (हिंदी): विनय चंद्रकांत जंगम (हिंदी), गुलामगौस फिरोज तांबोळी (हिंदी), अविनाश दिलीप कांबळे (हिंदी), श्रद्धा लोंढे (हिंदी). उज्वला चंद्रकांत कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन).

कविता लेखन स्पर्धा (इंग्रजी): अनिकेत मच्छिंद्र कांबळे (इंग्रजी), नेहा रघुनाथ शिंदे (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), प्रतीक्षा शामराव पाटील (संगीत व नाटयशास्त्र), श्रीधर शिवाजी निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), साक्षी शिवाजी इंजर (राज्यशास्त्र).

नाटय लेखन स्पर्धा (मराठी): ऋतुजा आरती बडवे (संगीत व नाटयशास्त्र), श्रीधर शिवाजी निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), साक्षी शिवाजी इंजर (राज्यशास्त्र), आदित्य रविंद्रनाथ सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), आनंद गोपाळराव निळे (संगीत व नाट्यशास्त्र).

नाटय लेखन स्पर्धा (हिंदी): अविनाश दिलीप कांबळे (हिंदी), स्वप्नाली महादेव धुलुगडे (हिंदी), श्रीधर शिवाजी निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), आदित्य रविंद्रनाथ सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), गुलामगौस फिरोज तांबोळी (हिंदी).

नाटय लेखन स्पर्धा (इंग्रजी): नेहा रघुनाथ शिंदे (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), सत्यम मार्तंड देवकुळे (इंग्रजी), ओंकार राजकुमार भोसले (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), प्रेम विठ्ठल पवेकर (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), श्रीधर शिवाजी निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी).

12 JAN 2026
लोकमत

# कोल्हापुरी गूळ हा सातत्यपूर्ण संशोधनामुळेच देशभर प्रसिद्ध

## जे. पी. जाधव, सखोल, संशोधनानेच देशाची जागतिक स्तरावर झेप

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली** : कोल्हापूर जिल्ह्यात पाच नद्यांच्या संगमामुळे वेगवेगळे खनिज घटक मातीत मिसळतात. त्यामुळे येथे उत्पादित उसापासून तयार होणाऱ्या गुळात मॅग्नेशियम, आयर्न व लोहासारखे पोषक घटक मुबलक प्रमाणात आहेत. यामुळेच कोल्हापुरी गूळ उच्च प्रतीचा व देशभर प्रसिद्ध आहे. अशा सखोल आणि सातत्यपूर्ण संशोधनातूनच समाजहित साध्य होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू प्रा. डॉ. जे. पी. जाधव यांनी केले. त्या सांगलीत कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून बोलत होत्या.

'विज्ञान आणि तंत्रज्ञानामधील नवसंशोधन' या विषयावर दोन दिवसीय परिषद पार पडली. त्यामध्ये देश-विदेशातील सुमारे ६०० शास्त्रज्ञ, संशोधर्क व तज्ज्ञ सहभागी झाले. परिषदेत ३६३ शोधनिबंध सादर झाले. लठ्ठे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. मानद सचिव सुहास पाटील यांनी नावीन्यपूर्ण संशोधन, पेटंटसाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी. पी. लाडगावकर यांनी केले. समन्वयक म्हणून डॉ. एस. एस. वाडकर, प्रा. डॉ. आर. व्ही. कुपवाडे यांनी जबाबदारी सांभाळली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शांतिनाथ कांते, उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील, प्रमोद चौगुले आदी उपस्थित होते. परिषदेत वैज्ञानिक सादरीकरण झाले. डॉ. प्रवीण जाधव, डॉ. माधव जोगळेकर, डॉ. रॅपीफन डांग्टुंगी आदी संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डाटा सायन्स, जैवतंत्रज्ञान, पर्यावरण विज्ञान, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चर आदी शोधनिबंध वाचले गेले.

12 JAN 2026
पुण्यनगरी

# ई-कंटेंटबाबत आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत 'ई-कंटेंट डेव्हलपमेंट आणि ऑनलाइन पेडॅगॉजी' कार्यशाळा दि. १२ व १३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हाईल, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. विविध विद्याशाखांतील अध्यापन व अध्ययन अधिक गुणवत्तापूर्ण, डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा होत आहे. यासाठी पुणे येथील विद्यादीप फाऊंडेशनचे शैक्षणिक तंत्रज्ञ डॉ. दीपक ताटपुजे, व्हिडीओ एडिटर सतीश शेंडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

12 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# नदी हाच माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू : मनोज बोरगावकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

नदी हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन 'नदीष्ट' या सुप्रसिद्ध कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित 'लेखक मुक्तसंवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.




बोरगावकर म्हणाले, निसर्ग वाचणं हीच एक अद्भुत गोष्ट असते. तो आनंद अपूर्व असतो. यासाठी मात्र लेखकाने इमान शाबूत ठेवायला हवे. निसर्गाशी नाते जोडायला हवे. यातूनच मी नदीशी जोडला गेलो. नदी हे आईचे रूप आहे. त्यामुळे नदी वाहती राहिली पाहिजे. मी जे केलं ते अंतःकरणातून. गोदामायने व तिथल्या निसर्गाने मला लिहिण्याची प्रेरणा दिली. माझ्या कादंबरीतील घटना या प्रत्यक्ष जीवनाशी निगडित आहेत. सगुणा ही या कादंबरीचा कणा आहे. स्त्री, आई, कविता आणि नदी ही मला एकसारखीच वाटते. यामुळेच नदी माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला. त्यामुळेच जीवनातील एक कवडसा शोधता आला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. शिंदे म्हणाले, 'नदीष्ट'मध्ये मातृत्वाचे एक रूप आणि दुसरे जीवनाचे रूपक आढळते. यातून मानवाचा प्रवास ध्यानात येतो. ही कादंबरी पर्यावरण, सामजिक जाणीव आणि मानवी सहसंबंधांचा शोध घेते. कादंबरी लेखकाची विज्ञानविषयक निरीक्षणे ही वाखाणण्यासारखी आहेत. ही कादंबरी वाचकांचे वाचनभान समृद्ध करणारी आहे.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, कृष्णा दिवटे, सुषमा शितोळे, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. केदार मारुलकर, प्रा. जयसिंग सावंत, अनिल साबळे उपस्थित होते.

1 2 JAN 2020

पुढारी

# विद्यापीठात 'ई-कंटेंट, ऑनलाईन पेडॅगॉजी' विषयावर उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत विविध विद्याशाखांतील अध्यापन व अध्ययन अधिक गुणवत्तापूर्ण, डिजिटलदृष्ट्या सक्षम व प्रभावी करण्याच्या उद्देशाने 'ई-कंटेंट डेव्हलपमेंट आणि ऑनलाईन पेडॅगॉजी' या विषयावर दि. १२ व १३ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. कार्यशाळेसाठी पुणे येथील विद्यादीप फाऊंडेशनचे शैक्षणिक तंत्रज्ञ डॉ. दीपक ताटपुजे तसेच व्हिडीओ एडिटर व गुगल जेमिनी सर्टिफाईड एज्युकेटर सतीश शेंडे मार्गदर्शन करणार आहेत.